राज्यात जलक्रांती अभियान राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: २०१६ /प्र.क्र.६९६ /जल-७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक: १७ जुलै, २०१७**

**वाचा -**

१) जलसंसाधन, नदी विकास आणि गंगा संरक्षण, मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अ.शा.पत्र क्र.त-२००११/८/२०१४-PR, दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ .
२) प्रादेशिक संचालक, केंद्रीय भूजल बोर्ड, नागपूर यांचे पत्र क्र. ७/२/५/TS/CGWB/CR-४९८५, दिनांक ०८ सप्टेंबर, २०१६.
३) प्रादेशिक संचालक, केंद्रीय भूजल बोर्ड, नागपूर यांचे पत्र क्र. ७/२/५/TS/CGWB/CR-४११२१ , दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१६.
४) प्रादेशिक संचालक, केंद्रीय भूजल बोर्ड, नागपूर यांचे पत्र क्र. ७/२/५/TS/CGWB/CR-४, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६.
५) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक:जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४.

**प्रस्तावना :**

देशात “जल” या विषयाशी संबंधित सर्व यंत्रणामध्ये मोठया प्रमाणात चळवळ निर्माण करुन त्यांच्यामध्ये जलसुरक्षा आणि जलसंधारणाच्या महत्वाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाच्या जलसंसाधन नदी विकास व गंगा संरक्षण मंत्रालयाने “जलक्रांती अभियान” मोहीम हाती घेतली आहे. या अभियानांतर्गत विहीत मुदतीत अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी उपाययोजना निश्चित करण्यात आल्या आहेत.

जलक्रांती अभियानाचे ५ मुख्य घटक खालीलप्रमाणे आहेत.

१) जलग्राम योजना
२) प्रभावी लाभक्षेत्र
३) प्रदुषण कमी करणे
४) जनजागृती कार्यक्रम
५) इतर उपक्रम

वरील ५ मुख्य घटकांपैकी घटक क्र. १) जलग्राम योजना याबाबत जलसंधारण विभागामार्फत कार्यवाही करण्यात येणार असून इतर घटकांबाबत घटकनिहाय वेगवेगळया विभागांनी कार्यवाही करावयाची आहे.

२) प्रभावी लाभक्षेत्र : सदर घटकासंबंधित पुढील कार्यवाही जलसंपदा विभागामार्फत करण्यात येईल.
३) प्रदुषण कमी करणे : सदर घटकासंबंधित पुढील कार्यवाही केंद्रीय भुजल बोर्ड, नागपूर या विभागामार्फत करण्यात येईल.

४) जनजागृती कार्यक्रम : सदर घटकासंबंधित पुढील कार्यवाही केंद्रीय भुजल बोर्ड, नागपूर या विभागामार्फत करण्यात येईल.
५) इतर उपक्रम : सदर घटकासंबंधित पुढील कार्यवाही केंद्रीय भुजल बोर्ड, नागपूर या विभागामार्फत करण्यात येईल.

सदर अभियान यशस्वीपणे राबविण्या संदर्भात केंद्रशासनाकडून प्राप्त झालेल्या सूचनांनूसार राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय समित्या स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या जलसंसाधन, नदी विकास व गंगा मंत्रालयाने राज्यातील ३४ जिल्हयात जलक्रांती अभियान राबविण्यासाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय समित्या स्थापन कराव्यात असे निदेश दिले आहेत. तथापि या जलक्रांती अभियानाप्रमानेच राज्यात संदर्भाधीन शासन निर्णय ५ डिसेंबर, २०१४ अन्वये "सर्वांसाठी पाणी-टंचाईमुक्त महाराष्ट्र-२०१९" अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी "जलयुक्त शिवार अभियान" राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत विभागस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तरीय समित्या अस्तित्वात आहेत. त्याच समित्यांमार्फत व जलयुक्त शिवार अभियानाच्या धर्तीवर जलक्रांती अभियान राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. या योजनेचे कामकाज जलयुक्त शिवार अभियानांतर्गत अस्तित्वातील विभाग, जिल्हा व तालुकास्तरीय समितीमार्फत हाताळण्यात यावे. राज्यस्तर व ग्रामस्तरावर जलयुक्त शिवार अभियानांतर्गत समिती अस्तित्वात नसल्यामुळे राज्यस्तरावर व ग्रामस्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

## २.१ राज्यस्तरीय कार्यकारी समिती::-

| | | |
|---|---|---|
| १ | सचिव, जलसंधारण विभाग (रोहयो व जसं) मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | मुख्य अभियंता व सह सचिव जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ३ | मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, पुणे | सदस्य |
| ४ | विभागीय मुख्य अभियंता, केंद्रीय जल आयोग, भारत सरकार, नागपूर | सदस्य |
| ५ | कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | ग्राम विकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| १० | आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | विभागीय संचालक, सेंट्रल ग्राऊंड वॉटर बोर्ड, भारत सरकार, नागपूर | सदस्य सचिव |

समितीचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी उपरोक्त सदस्यांव्यतिरिक्त अधिकचे ४ सदस्य अध्यक्ष निवडू शकतील.

सदर राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

१. राज्यात जलक्रांती अभियानाचे नियोजन, संनियंत्रण व अंमलबजावणी करणे
२. अभिसरणात्मक दृष्टीकोनातून जलग्राममध्ये जलस्त्रोतांचा विकास व जलव्यवस्थापनकरीता मार्गदर्शन करणे.
३. जिल्हा पातळीवरील समितीने सादर केलेल्या प्रस्तावांची/शिफारशींची छाननी करणे. मार्गदर्शक तत्वांनुसार व निकषांनुसार जलक्रांती अभियानाची तालुका पातळीवरील व गाव पातळीवरील समितीमार्फत अंमलबजावणी होत असल्याची खात्री करणे.
४. निधीमागणी प्रस्ताव हा संबंधित विभागास सादर करणे.

**२.२ ग्रामस्तरीय समिती::-**

| | | |
|---|---|---|
| १ | सरपंच | अध्यक्ष |
| २ | तलाठी | सदस्य |
| ३ | आरोग्य अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र | सदस्य |
| ४ | सभापती, पाणी पुरवठा,ग्रामपंचायत | सदस्य |
| ५ | चेअरमन/पाणी वापर संस्थाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | स्वंयसेवी संस्थेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | चेअरमन/महिला स्वंयसहायता गटाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | मुख्याध्यापक,प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा | सदस्य |
| ९ | कृषि सहाय्यक | सदस्य सचिव |
| १० | ग्रामसेवक | सदस्य |

**३.** जलक्रांती अभियानांतर्गत दरवर्षी राज्यस्तर समितीच्या सुचनेनुसार गावांची निवड करून जलयुक्त शिवार अभियानाप्रमाणेच जलपरिपुर्ण करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**३.१ नोडल अधिकारी :**

नोडल अधिकारी म्हणून संचालक, केंद्रीय भुजल बोर्ड, नागपूर यांची नियुक्ती करण्यात येत आहे. नोडल अधिकारी हे राज्य जलक्रांती अभियानाच्या यशस्वीतेसाठी जबाबदार असतील. नोडल अधिकाऱ्यांची कामे खालीलप्रमाणे असतील.

१. राज्याच्या जलक्रांती अभियानांतर्गत प्रशिक्षण कार्यशाळा व इतर बाबींची अंमलबजावणी करणे.
२. जलक्रांती अभियानाशी संबंधीत बाबींची राज्यस्तरीय अंमलबजावणी करणे.
३. राज्य स्तरावर वेगवेगळया मंत्रालयीन विभागाशी व लाभधारकांशी समन्वय साधणे.
४. राज्यस्तरीय जलक्रांती अभियानाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.

**४. प्रत्येक जलग्रामसाठी अतिरिक्त उपक्रम :**

१. पाण्याशी संबंधीत मुद्यांबाबत जागरुकता करण्यासाठी जल मित्रांना योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांचा एक संवर्ग तयार करणे.

२. संबंधीत महिला पंचायत सदस्यांस जलमित्र होण्यासाठी प्रोत्साहित करणे. त्यास "नीर-नारी" असे नाव देणे.

३. प्रत्येक जल ग्राम साठी सुजलाम कार्ड ("Water Saved, Water Produced/पाणी बचत, जल निर्माण"च्या बोध चिन्हासहित) या नावाने एक कार्ड बनविण्यात यावे, जे गावासाठी उपलब्ध पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता संबंधीत वार्षिक स्थिती/माहिती उपलब्ध करेल.

४. राष्ट्रीय समितीच्या मान्यतेने जल क्रांती अभियानाचा उद्देश लक्षात घेऊन जल ग्राममध्ये अशा प्रकारचे आणखी कामे केली जाऊ शकतात. परंतु हे स्पष्ट करण्यात येत आहे की या कामांसाठी वेगळा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही आणि ही कामे इतर योजनांमध्ये समाविष्ट करुन करावी लागतील.

**<u>जल ग्राम योजनेअंतर्गत इतर अतिरिक्त उपक्रम</u> :**

| अ.क्र. | उपक्रम | यंत्रणा |
|---|---|---|
| १ | सुजलाम कार्ड सुरु करणे | जिल्हास्तरीय समिती |
| २ | जलमित्र/नीर नारी ओळख | गटविकास अधिकारी |
| ३ | जल मित्र/नीर नारी प्रशिक्षण | केंद्रीय जल आयोग |
| ४ | जल मित्रांचा मेळावा (तीन ठिकाणी) | केंद्रीय जल आयोग/केंद्रीय भुजल बोर्ड |

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०७१७१४२२००४४२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RD and WCD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, cn=Narayan Karad
Date: 2017.07.17 15:37:12 +05'30'

**(ना.श्री.कराड)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३) मा. अध्यक्ष/सभापती, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

४) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

५) सर्व मा. संसद सदस्य/ विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य

६) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
८) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९) मा. मंत्री, (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
१०) मा. राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
११) मा. सचिव (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर
१३) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर
१४) विभागीय आयुक्त, सर्व
१५) आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, पुणे
१७) मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर
१८) जिल्हाधिकारी, सर्व
१९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
२०) संचालक, केंद्रीय भूजल बोर्ड, नागपूर
२१) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र विकास, पुणे
२२) अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, सर्व
२३) कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, सर्व
२४) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व
२५) जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२६) जल-७ संग्रहार्थ